**नि.क्र. १२९**

**प्रतिवादी क्र. १ तर्फे साक्षीदार क्र. ७ चा उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे विधिज्ञ श्री. ए. जी. कुलकर्णी यांचेतर्फे शपथेवर सुरू:–**

७. प्रतिवादी क्र. १ चे नाव प्रताप शेषेराव पाटील आहे. संबंधितांना स्थळ पाहणीसाठी नोटीस पाठवली त्याच्या प्रती याकामी दाखल केल्या आहेत किंवा नाही याची माहिती मला नाही. शेजारीपाजारी यांना मी नोटीस दिल्या होत्या त्यांची मला वैयक्तिक माहिती नाही. मी दि.०३/०९/२००७ रोजी स्थळ पाहणीसाठी गेलो होतो तेथील मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वहितीची नोंद एका वर्षासाठी असते ती प्रत्येक वर्षाला बदलु शकते. हे म्हणणे खरे आहे की, शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे ज्याचे नाव ७/१२ च्या उता–याला आहे त्याची वहिती धरण्यात येते. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, पुर्वी ७/१२ च्या नावावर ज्या व्यक्तीचे नाव असेल त्याच्या व्यतिरिक्त वहिती करण्या–याचे नाव असायचे. हे म्हणणे खरे नाही की, २००७–२००८ साली ज्याचे नाव ७/१२ च्या उता–यावर मालक म्हणुन असायचे त्याचेच वहितीमध्ये नाव ग्राहय धरले जायचे.

८. चागुणाबाई डिग्रसे यांचा जबाब नि.क्र. १३१ मी नोंदवला त्यावेळेस त्यांचे वय ९० वर्ष होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी चागुणाबाई आजारी होत्या व त्यांना दिसत नव्हते तसेच त्यांना लिहता वाचता येत नव्हते.

हे म्हणणे खरे नाही की, मी चागुणाबाई डिग्रसे यांचा जबाब नि.क्र. १३१ नोंदवला त्यानंतर त्यांना जबाबातील मजकुर वाचुन दाखवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जबाब नि.क्र. १३१ वर सुशिलाबाई यांनी समक्ष म्हणुन सही केली नाही.

९. दि.०३/०९/२००७ रोजी मी पंचनामा (नि.क्र.१३०) कोणत्या गट क्रमांकामध्ये केला याची वैयक्तिक मला माहिती नाही. विठ्ठल केरबा भोईबार यांची जमिन कोणत्या गट क्रमांकामध्ये आहे हे मला आता सांगता येणार नाही. मी दि.०३/०९/२००७ रोजी पंचनामा केला त्यावेळी मी प्रतिवादी क्र. १ चे कागदपत्र पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा (नि.क्र.१३०) मध्ये प्रतिवादी क्र. १ च्या बटईपत्राचा व करारनाम्याचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विठ्ठल केरबा भोईबार याचा जबाब (नि.क्र.१३३) खोटा नोंदवला आहे, त्यास लिहता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानोबा पांडूरंग मुकादम याला लिहता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानोबा पांडूरंग मुकादम याने माझ्या समक्ष जबाब दिलेला नाही, मी प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्यावरून त्याचा खोटा जबाब नोंदवलेला आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा (नि.क्र.१३०) मधील पंचाची माझी वैयक्तिक ओळख नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा (नि.क्र.१३०) प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्यावरून तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३/०९/२००७ रोजी ज्यावेळी मी पंचनामा (नि.क्र.१३०) केला

त्यावेळेस प्रतिवादी क्र. १ ची वहिती त्याठिकाणी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी चागुणाबाई डिग्रसे व प्रतिवादी क्र. २ यांचा सदर जमिनीवरती ताबा होता.

११. रागिनी डिग्रसे यांच्याकडून मला आक्षेप अर्ज प्राप्त झाला होता त्याची प्रत मी याकामी दाखल केली नाही. त्या आक्षेप अर्जानुसार मी शेत शेजारी यांना नोटीस दि.१८/०९/२००७ रोजी काढल्या होत्या त्याच्या प्रती याकामी दाखल केलेल्या नाहीत. त्याठिकाणी जायमोक्यावर साक्षीदार हजर होते व पोलीस पाटील हजर होते. त्या पोलीस पाटलाचे नाव शिवाजी बाबुराव पाटील असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा (नि.क्र.१३८) मुळ प्रतिप्रमाणे बरोबर नाही, त्यावर पोलीस पाटलाची सही नाही व सात साक्षीदारांच्या सहया नाहीत.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१८/०९/२००७ रोजी गट क्र. १७२ चा पंचनामा केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.१३९ वरिल चागुणाबाई यांचा खोटा जबाब नोंदवला. मला पुर्व बाजुचा शेजारी बबन गंगाराम डिग्रसे यांचा गट क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बबन गंगाराम डिग्रसे यांचा खोटा जबाब नोंदवला. विठ्ठल भोईबार याचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विठ्ठल भोईबार याचा जबाब (नि.क्र.१४०) खोटा नोंदवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा (नि.क्र. १४३) खोटा तयार केला.

१३. मी प्रतिवादी क्र. २ चा जबाब (नि.क्र.१४२) नोंदवला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांच्या जबाबामध्ये असे सांगितले आहे की, त्यावेळी बालाजी भोईबार हे पेरणी करत होते. पंचनामा (नि.क्र. १४३) मध्ये त्याठिकाणी बैल व बैलगाडी होते असा उल्लेख आहे. ते कोणाच्या मालकीचे होते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्यावरून खोटा पंचनामा (नि.क्र.१४३) तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२०/०९/२००७ रोजी खोटा अहवाल (नि.क्र.१४५) दिला आहे.

१४. गट क्र. २६६ आणि १७२ मध्ये प्रतिवादी क्र. १ यांनी त्याच्या नावाने फेरफार व्हावा असा अर्ज दिला होता व त्यास प्रतिवादी क्र. २ यांनी आक्षेप घेतला होता किंवा नाही याची माहिती मला नाही. मला आता यादी नि.क्र. १४८ वर दाखल केलेली फेरफार प्रत दाखवली असता त्यावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या विरोधात फौजदारी केस दाखल होती. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्यावरून खोटे जबाब नोंदवुन खोटे पंचनामे केले व खोटा अहवाल सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस प्रतिवादी क्र. १ चा ताबा नव्हता.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.11.12 11:06:53 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः-११.११.२०२५

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.